Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VI ISSUE-IX SEPTEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# स्वतंत्र भारताच्या सुरूवातील काळातील भारताचे आर्थिक धोरण व पंडित जवाहरलाल नेहरूंची भूमिका : एक अध्ययन

**पराते प्रकाश मधुकरराव**
एम.ए. (अर्थ, समाज), एम. फिल., बी.एड्.,

**डॉ.धनवटे संजय पं.**
एम.ए., एम फिल, पीएच. डी. (अर्थशास्त्र)
मॉडेल आर्टस्, कॉमर्स अॅन्ड सायन्स कॉलेज, कारंजा (घा.) जि वर्धा.

## १.० प्रस्तावना

*आधुनिक काळात, जागतिक स्तरावर विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये शासनाच्या विविध आर्थिक धोरणांची भूमिका व त्यांची अंमलबजावणी व सर्वागीण विकास या संकल्पनांचा वारंवार उल्लेख केला जातो. या व्याख्यांमुळेच सर्वसाधारणपणे कोणत्याही राष्ट्राच्या आर्थिक विकासाची दशा व दिशा ठरत असते. विविध अर्थशास्त्र व सामाजिकशास्त्रांशी संबंधित अभ्यासकांनी सामाजिक विकास आणि लोकसहभाग यासंबंधी नेहमीच लेखन आणि संशोधन केले आहे. असे असताना देखील राष्ट्राचा विकास आणि त्यांत आर्थिक धोरणांची भूमिका याची स्पष्ट रूपाने परिभाषा अथवा त्यास मापनाचे संकेतक कसे असावेत याविषयी एकमत झालेले दिसत नाही. या कारणामुळे भारत देश स्वतंत्र झाल्यावर नेमक्या कोणत्या प्रकारच्या आर्थिक गरजांना प्राधान्य द्यावे ज्यामुळे अपेक्षित आर्थिक विकास होईल हा मोठा प्रश्न तत्कालिन राज्यकर्त्यांना होता प्रामुख्याने भारताचे पंतप्रधान म्हणुन पंडित जवाहरलाल नेहरूंची भूमिका फार महत्वाची होती. याच कारणाने स्वातंत्र्योत्तर भारतीय समाजाच्या विकासासंदर्भात पंडित जवाहरलाल नेहरू प्रणित विविध आर्थिक धोरणांचे मूल्यमापन प्रस्तुत अध्ययनाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न केला आहे.*

*भारतीय समाजाची (विशेषत: ग्रामीण समाजाची) दुरवस्था ही ब्रिटिश राजवट प्रस्थापित होण्याबरोबर वाढत गेली. कारण "ब्रिटिश राजवटीपूर्वी या देशातील ग्रामीण समाज स्वतंत्र, स्वायत्त व स्वयंपूर्ण होता." (पाटील व चुनखडे १९९०) प्राचीन तसेच मध्ययुगीन काळात भारतीय खेडी राजकीयदृष्टया व आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण होती. ग्रामीण समाज जीवन एकसंध होते आणि सामूहिक हिताला प्राधान्य दिले जात होते. ब्रिटिश राजवटीच्या काळात येथील ग्रामीण समाजाच्या अधोगतीला प्रारंभ होऊन समाजाचे विघटन होऊ लागले. व्यक्ती समूह केंद्रिततेकडून आत्मकेंद्रित बनू लागले. तेव्हा या ग्रामीण समाज जीवनाच्या विकासासाठी वेगवेगळ्या पातळीवर प्रयत्न सुरू झाले. ते स्वातंत्र्यपूर्व काळातील इटावा प्रोजेक्ट, फरिदाबाद कॅम्प, फिरका प्रोजेक्ट इत्यादींच्या रूपाने दिसून येतात.*

*भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ग्रामीण समाजाचा मागसलेपणा दूर करण्यासाठी आणि समाजातील विविध सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी उपाय योजना करणे शासकीय पातळीवर आवश्यक होते. जवळपास ऐंशी टक्के जवळपास ऐंशी टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास होती. त्यामुळे ग्रामीण भागांच्या विकासाकडे दुर्लक्ष करून चालणार नव्हते. कारण येथील ग्रामीण समाजाचा विकास म्हणजे पर्यायाने देशाचा, राष्ट्राचा विकास असेच सूत्र होते. ग्रामीण समाजातील दारिद्र, बेकारी, निरक्षरता, अज्ञान, रोगराई यासारख्या भयंकर समस्यांचे निमूर्लन केल्याशिवाय देशाचा विकास होणे असंभव होते. राष्ट्राच्या सर्वांगीण विकासात आर्थिक विकासाचे महत्व आणि कल्याणकारी राज्याची संकल्पना लोकशाही मार्गाने साध्य करण्यासाठी सरकारने नियोजनबद्ध विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आणि त्यादृष्टीने भारताचे पंतप्रधान म्हणुन पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपल्या आर्थिक धोरणांच्या अनुशंगाने विविध योजना राबविलेल्या आहेत.*

### *भारतातील तत्कालिन परिस्थिती*

*स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालावधित भारतातील बहुतांश जनता ग्रामीण क्षेत्रात वास्तव्यास होती.*

ग्रामीण क्षेत्र अनेकार्थांनी शहरी क्षेत्रापेक्षा भिन्न होते व आजही बऱ्या प्रमाणात आहे. सर्वप्रथम ग्रामीण क्षेत्राची स्थिती, नातेसंबंधांची व्यवस्था आणि नातेसंबंध व कुटुंब संस्था यातील सहसंबंधांच्या माध्यमातून निवासी क्षेत्र निर्माण झाले. तेच पुढे ग्रामीण क्षेत्र म्हणून ओळखले जाऊ लागले. एक कटू सत्य असे आहे की, "शहरी क्षेत्राचा विकास ग्रामीण क्षेत्राच्या किमतीवर झालेला आहे." (इर्मीजंए १९८४) आधुनिक काळात मात्र नगर संस्कृतीच्या वाढत्या प्रभावामुळे ग्रामीण क्षेत्राची अवहेलना होत आहे.

भारतामध्ये आर्थिक विकासासाठी स्वातंत्र्यपूर्व काळापासून वेगवेगळया स्तरांवर प्रयत्न झालेले आहेत. स्वातंत्र्यानंतर देखील देशाची सर्वांगीण प्रगती घडून आणण्याच्या उद्देशाने व लोकशाही मार्गाने कल्याणकारी राज्याची निर्मिती करणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वात भारत सरकारद्वारे नियोजनबद्ध विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. त्याचाच एक भाग म्हणजे पंचवार्षिक योजना होय. देशात पहिली पंचवार्षिक योजना १९५१ मध्ये सुरू करण्यात आली होती. पंचवार्षिक योजनांची यशस्वी वाटचाल ही पूर्णतः ग्रामीण विकासावर अवलंबून आहे याची जाणीव भारतातील राज्यकर्त्यांना व विचारवंतांना लवकरच झाली. कारण भारतातील ८० टक्के लोक ग्रामीण भागात वास्तव्यात असल्याने जोपर्यंत ग्रामीण समाजाचा मागासलेपणा दूर होऊन त्यांच्या विकासाला चालना मिळत नाही तो पर्यंत देशाची सर्वांगीण प्रगती होणे शक्य नाही. "तेव्हा पंचवार्षिक योजनांना गती प्राप्त करून देण्यासाठी व देशाचा विकास घडवून आणण्यासाठी सरकारने २ ऑक्टोंबर १९५२ रोजी समुदाय विकास कार्यक्रमांना सुरूवात केली." (पाटील व चुनखडे, १९९०) समुदाय विकास कार्यक्रमास सुरूवात होणे खऱ्या अर्थाने ग्रामीण विकासाच्या क्षेत्रामध्ये क्रांतिकारक योजना होती.

### पंडित नेहरूंचे आर्थिक विकासासंबंधी विचार

पंडित जवाहरलाल नेहरूंप्रमाणे, सर्वांसाठी समान संधी मिळवून देणे, श्रीमंत आणि गरिबांमधील अंतर मिटवणे आणि जीवनास्तर उंचावणे हे लोकहितकारी राज्याची आधारभूत तत्वे आहेत. नेहरूंच्या मते राज्य म्हणचे सामान्य जीवनातील शांततापूर्ण व्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी तसेच व्यक्तीला आर्थिक भौतिक समृद्धी देण्यासाठी एक आवश्यक राजकीय संस्था आहे. नेहरूंच्या विचारांमध्ये गांधीजींप्रमाणे राज्यविरहित समाजाची कल्पना नाही. जरी मनुष्य एक विवेकशील प्राणी आहे तरीसुद्धा मानवी जीवनात हिंसा, लोभ, स्वार्थ, संघर्ष यासारख्या प्रवृत्ती देखील दिसून येतात, ज्या सामाजिक जीवनात असंतुलन निर्माण करतात. मनुष्याची अराजक प्रवृत्ती संस्कृती आणि संरक्षण नष्ट करू नये यासाठी राज्यासारख्या बाध्यकारी शक्ती असणे आवश्यक आहे.

नेहरूंसाठी राज्य स्वत:मध्ये एक साध्य नाही. राज्य व्यक्तीच्या हिताच्या संवर्धनाचे एक महत्वाचे साधन आहे. व्यक्तीचे स्वातंत्र्य तसेच त्याचा आर्थिक विकास राज्याचे खरे आदर्श आहेत. मनुष्याच्या सृजनात्मक शक्तींच्या पूर्ण विकासाच्या परिस्थिती निर्माण करणे राज्याचा उद्देश आहे. कोणत्याही राज्यातील व्यक्तींच्या नैसर्गिक प्रेरणांची पूर्ती तसेच श्रेष्ठ जीवन मिळवून देणारी परिस्थिती निर्माण करणे राज्याचे आवश्यक कार्य आहे. नेहरूंचा राज्याकडे बघण्याचा प्रश्न प्रयोगवादी दृष्टिकोन आहे. 'राज्याच्या प्रकारांमध्ये नेहरू लोकशाही तसेच लोककल्याणकारी राज्याचे प्रतिपादन करतात. राजेशाही, कुलीन पद्धती तसेच हुकुमशाही सारख्या पद्धतींमध्ये व्यक्तीच्या विकासाची काही शक्यता नाही कारण यांच्यामध्ये व्यक्तीचे शोषण होते.

नेहरूंच्या विचारांचा केंद्रबिंदू व्यक्तीचा पूर्ण विकास आहे. आणि व्यक्तीचे हे आदरयुक्त स्थान या पद्धतींमध्ये हिसकावून घेतले जाते. नेहरूंची उदारवादी लोकशाहीत गाढ निष्ठा आहे असे त्यांच्या विविध कार्यांवरून लक्षात येते. नेहरूंच्या मते याचे कारण असे आहे की लोकशाही, लोकजीवनातील आदर्श मिळवण्याचा योग्य मार्ग आहे कारण हा मार्ग शांततापूर्ण असतो. इतर दुसऱ्या प्रकारच्या राज्यपद्धती व्यक्तीवर असह्या दमनकारी ओझे टाकतात. लोकशाही हे दडपण बाजूला करते. सत्तेच्या माध्यमातून लादलेली शिस्त लोकशाहीत आत्मअनुशासनात बदलते. यामध्ये अल्पसंख्यांक वर्ग देखील आपल्या समस्या सोडविण्यासाठी परवानगी देतात, ज्यामुळे संघर्षाचा शेवट होतो. लोकशाही एक अशी राज्यव्यवस्था आहे ज्यामध्ये सामाजिक तसेच

राजकीय समस्या शांततेने सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. याशिवाय लोकशाही व्यक्तीला विकासाची संधी देते (Nehru's Speeches 1953-57).

लोकशाहीच्या माध्यमातून समाजवादाला सर्वोच्च मानवी मूल्ये दिली जातात. हा वादविवाद, तर्क, विनंती. विनयाचा मार्ग आहे. ज्यामध्ये निर्णयांना यासाठी स्वीकारले जाते की त्यामध्ये जास्तीत जास्त व्यक्तींची सहमती असते. सर्वाधिकारवादी राज्यांमध्ये फांसीष्टवाद किंवा हुकुमशाही पद्धतींमध्ये व्यक्तीच्या या स्वातंत्र्याचा ऱ्हास होतो. नेहरू कबूल करतात की भारतात क्वचितच अशी दुसरी व्यक्ती असेल ज्याने फॅसिझम आणि नाझीवादाच्या विरूद्ध आपला कणखर आवाज उठवला असेल जितका त्यांनी स्वत: उठवला आहे.

**भारताचे आर्थिक धोरण व पंडित जवाहरलाल नेहरूंची भूमिका**

पंडित जवाहरलाल नेहरूंना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतासारख्या अविकसित राष्ट्रात तर ग्रामीण विकासाची गरज फारच तीव्रतेने भासले होते. त्याकरीता विविध परंपराप्रिय ग्रामीण जनतेला आधुनिक शास्त्रीय दृष्टिकोण पटवून देऊन तिला आर्थिक विकासाच्या मार्गावर शक्य तितक्या लवकर आणण्याचे प्रयत्न शासनाला करावे लागणार होते याची त्यांना जाणीव होती. म्हणुनच आर्थिक विकासाच्या आड येणाऱ्या सामाजिक रूढी व चालीरीती यांचे ग्रामीण जीवनातील वर्चस्व कमी व्हावे, याकरीता शिक्षणाच्या व दळणवळणाच्या सोयी भरपूर प्रमाणावर पुरवून ग्रामीण जनतेला विकासोन्मुख केल्यानंतरच ग्रामीण विकासाचे पाऊल पुढे पडू शकते याकारणाने या बाबींवर सुरूवातीच्या आर्थिक धोरणात भर देण्यात आला होता.

कुठल्याही नव स्वातंत्र्य राष्ट्राच्या विकासाला बाधक ठरू पाहणाऱ्या घटकामध्ये ग्रामीण विकास व त्या अनुशंगाने महत्त्वपूर्ण ठरण्याऱ्या इतर बाबी जश्या ग्रामीण भागातील विद्युतिकरण, भौतिक सुविधा, आरोग्य केंद्रे, शिक्षणाच्या सुविधा (शाळा व महाविद्यालये), सिंचनाची सुविधा, कृषी क्षेत्रातील पायभुत सुविधा या सर्वांशी सम्बन्धीत बाबींचा समावेश पंडित जवाहलाल नेहरूच्या पंतप्रधान काळातील आर्थिक धोरणांमध्ये होता. जसे भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी अवघ्या ३,००० खेडयांचे विद्युतीकरण झाले होते. तर तिसऱ्या योजनेच्या अखेरीस हा आकडा ४५,००० वर गेला. या काळात विजेचा फायदा मिळालेल्या पंपांची व नलिकाकूपांची संख्या २१,००० वरून ५,१३,००० वर गेली. याच काळात भारतातील ८८ टक्के खेड्यांमध्ये वीज पोहचविण्यात आली.

ग्रामीण विद्युतिकरणाव्यातिरिक्त अन्नधान्यांचे उत्पादन वाढविण्याकडे देखिल विशेष लक्ष देण्यात आले. या करिता 'अधिक धान्य पिकवा चौकशी समिती' ने १९५१ साली सादर केलेल्या अहवालात शेती सुधारणेबरोबरच ग्रामीण विकासाच्या समग्र समस्येबाबत काही विचार मांडले. त्यांतूनच समूह विकास योजना व राष्ट्रीय विस्तार सेवा या महत्त्वपूर्ण योजना विकसित झाल्या. या सर्व योजना तत्कालिन आर्थिक धोरणात प्रमुख्याने समाविष्ट करण्याकडे पंडित जवाहलाल नेहरूंनी विशेष लक्ष दिले असल्याचे आढळते. एकंदरीत ग्रामीण विकासाला पंडित जवाहलाल नेहरूंच्या कार्यकाळात पंचवार्षिक योजनेंमार्फत नेहमीच महत्त्वपूर्ण स्थान लाभले. हि धोरणे ग्रामीण विकासाच्या त्रिविध समस्यांवर आधारित असून याचे स्वरूप आर्थिक व्यवसायांचा विकास, शिक्षण, आरोग्य वगैरेंसारख्या सामाजिक गरजांचा व सुविधांचा विकास व सांस्कृतिक, सामाजिक आणि वैचारिक दृष्टिकोनांत बदल घडविणे असे होते.

**निष्कर्ष**

प्रस्तुत संशोधनकार्यात संकलित केलेल्या माहितीवरून प्राप्त निष्कष पुढील प्रमाणे आहेत

- स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय अर्थव्यवस्था ही कृषी प्रधान अर्थव्यवस्था होती व भारतातील बहुतांश लोकसंख्या (साधारणत: भारतातील एकूण लोकसंख्येच्या ६५ ते ७० टक्के लोकसंख्या), किंबहुना आजचे चित्रदेखील काही फार प्रमाणात तसेच आहे.
- ब्रिटिशांची शासन व्यवस्था भारतात स्थापन झाल्यापासुन ब्रिटिशांनी कच्चा माल कमी किंमतीत भारतातून खरेदी करणे व पक्क्या मालात रूपांतरित करून तो जास्त किंमतीत

विकण्याचे स्वार्थी आर्थिक धोरण स्वीकारले होते. परिणामत: भारतीय शेतकरी व सामान्यांची पिळवणूक झाली. असे स्वर्थी धोरण असले तरी प्रथमच भारतीय व्यवस्थेत ब्रिटिश शासनाने नवीन व्यापार संकल्पनेचा उदय केला आणि आर्थिक व सामाजिक जीवन कायद्याने शासनाच्या नियंत्रणात आणले. त्यांमुळे आधिकारीकरीत्या भारतीय व्यवस्थेत विविध आर्थिक संकल्पनांचा परीचय ब्रिटिश शासनाद्वारे झाला असे म्हणावे लागेल.

- स्वातंत्र्योत्तर काळात भारताने पंडित जवाहरलाल नेहरूप्रणित आपल्या विकासाचे ध्येय गाठण्यासाठी आर्थिक नियोजनाचा अंगिकार केला व रशियाच्या धर्तीवर १९५० मध्ये नियोजन आयोगाची स्थापना भारतात देखील करण्यात आली व १९५१ पासून भारतात पंचवार्षिक योजनांचा प्रारंभ झाला. या योजनांमधून देशाचा सर्वागीण विकास करण्याचे ध्येय समोर ठेवण्यात आले.
- देशाच्या आर्थिक व औद्योगिक विकासाला स्थायी स्वरूप देण्यासाठी सामाजिक व शैक्षणिक विकास होणे क्रम प्राप्त आहे हे वास्तव मान्य करून पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली नियोजन आयोगाने सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी निश्चित निधी उपलब्ध करून दिला. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पुढाकारानेच भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला व देशाच्या आर्थिक विकासाकरिता पंचवार्षिक योजनांचा अंगीकार केला.
- पंडित जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली कामकाज सुरू करणाऱ्या नियोजन आयोगावर पुढील प्रकारची जबाबदारी सोपविण्यात आली होती ज्यामध्ये देशातील उपलब्ध संसाधनांचा अभ्यास करणे व या संसाधनांचा प्रभावी आणि संतुलित वापर करण्यासाठी पंचवार्षिक योजना तयार करणे, नैसर्गिक, भांडवली व मानवी साधन सामग्रीचा अंदाज करणे व देशाच्या गरजा लक्षात घेऊन या साधन संपत्तीत वाढ करण्याची क्षमता अजमाविणे व त्यासाठी मार्ग सुचविणे, देशाच्या साधन संपत्तीचा जास्तीत जास्त परिणाम कारक आणि समतोल विकास साधण्याच्या दृष्टीने दीर्घकालीन व दूरदर्शी नियोजन करणे हा होता.
- नियोजन आयोगाला आर्थिक विकासात बाधा टाकणाऱ्या गोष्टी शोधणे, आर्थिक विकासाआड येणाऱ्या प्रवाहाचा शोध घेऊन त्यांचा बिमोड करणे व प्रत्येक योजनेत झालेल्या प्रगतीचे मूल्यमापन करणे या देखील जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागणार होत्या.
- या अशा सर्वसमावेशक आर्थिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करणाऱ्या नियोजन आयोगाच्या स्थापनेद्वारे पंडित जवाहरलाल नेहरूंनी आपल्या दुरदृष्टीचा परीचय दिलेला आहे.

## ६.० आधारग्रंथ सूची


1. पाटील व्ही, चुनखडे एन. (१९९०) ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ. क्र. १०४
2. पाटील व्ही, चुनखडे एन. (१९९०) ग्रामीण समाजशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ. क्र. १५४
3. कोठेकर, शांता, आधुनिक भारताचा इतिहास (१९४७-२०००), श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००८
4. कल्याणकर, बा.ह. (संपा), पंडित जवाहरलाल नेहरू : व्यक्ती आणि कार्य, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२
5. घाटोळे. रा.ना., (२००९-१०), समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पध्दती, मंगेश प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती पृ.क्र. १ ते २३.
6. जरारे वि., (१९९५), संशोधन प्रणाली, सुविधा पब्लिशर्स, ३५-ए, नटराज नगर, इमली फाटक, जयपूर, पान क्रं. ७९
7. दाभोलकर, दे.अ. आर्थिक विकसाचा प्रश्न, पुणे १९६२.

8. देसाई, एस.एम. व जोशी, आर.डी., आर्थिक धोरण, राणे प्रकाशण, पूणे, १९७८
9. शेट्टी, एम. के. आर्थिक नियोजन, सुविचार प्रकाशन, नागपूर, १९९५
10. Mehata S. R. (1984), Rural Development Policies and Programmes : A Sociological Perspective, New Delhi, Sage Publication, Page No.13
11. Nehru's Speeches 1953-57, Govt of India, Publication Division, New Delhi, 1958, p. 139-140.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com